पुण्यनगरी



हातकणंगले : निवडीचे पत्र प्राचार्या डॉ. योजना जुगळे यांना देताना कुलगुरू डॉ. व्ही. एन. शिर्के. सोबत प्र. कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे.

# विद्यापीठ व्यवस्थापन समिती सदस्यपदी डॉ. योजना जुगळे


**हातकणंगले :** येथील अण्णासाहेब डांगे महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. योजना वसंतराव जुगळे यांची प्राचार्य प्रवर्गातून शिवाजी विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेच्या सदस्यपदी बिनविरोध निवड झाली. निवडीचे पत्र कुलगुरू डॉ. व्ही. एन. शिर्के यांनी प्राचार्या डॉ. जुगळे यांना दिले.

यावेळी प्र कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे उपस्थित होते. या निवडीबद्दल प्राचार्या डॉ. जुगळे यांचा सत्कार माजी ग्रामविकास व पाणीपुरवठामंत्री अण्णासाहेब डांगे व संत ज्ञानेश्वर शिक्षण संस्थेचे सचिव ॲड. राजेंद्र डांगे यांच्या हस्ते करण्यात आला.

जनसंपर्क कक्ष
1 5 MAR 2022 तरुण भारत शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# पुष्पविज्ञान संशोधनात विद्यापीठाचे योगदान

## पुष्पविज्ञान संशोधन संचालनालयाचे संचालक डॉ. के. व्ही. प्रसाद यांचे मत



कोल्हापूर : सामंजस्य कराराची अदान प्रदान करताना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, डॉ. के. व्ही. प्रसाद. सोबत प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे.

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठामध्ये वनस्पतीशास्त्रासह विविध विज्ञान शाखांमध्ये महत्त्वाचे संशोधन सुरू आहे. पुष्पविज्ञानाच्या संशोधन क्षेत्रातही विद्यापीठ भरीव योगदान देईल, अशी अपेक्षा भारतीय कृषी संशोधन परिषदेच्या (आयसीएआर) पुष्पविज्ञान संशोधन संचालनालयाचे (डीएफआर) संचालक डॉ. के. व्ही. प्रसाद यांनी व्यक्त केली.

पुणे येथील आयसीएआरचे पुष्पविज्ञान संशोधन संचालनालय आणि शिवाजी विद्यापीठाचा जैवतंत्रज्ञान अधिविभाग यांच्यात शैक्षणिक व संशोधकीय अदानप्रदानाविषयक सामंजस्य करार करण्यात आला. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के व प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती. याप्रसंगी ते बोलत होते.

डॉ. प्रसाद म्हणाले, पुष्पविज्ञान संचालनालयाच्या माध्यमातून संशोधन, तंत्रज्ञान, जनजागृती व प्रसार या अनुषंगाने व्यापक कार्य केले जाते. विद्यापीठासमवेत झालेल्या सामंजस्य करारामुळे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांमध्ये करिअर संधी म्हणूनही या शिक्षणाचा प्रसार करता येईल.

कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, संशोधनापासून ते स्वतंत्र व्यवसाय संधींपर्यंत अनेक शक्यता यात अंतर्भूत आहेत. त्या दृष्टीने काही विशेष प्रमाणपत्र अभ्यासक्रम हाती घेता येतील का, या दृष्टीनेही विद्यापीठ शक्यतांची पडताळणी करून पाहील. सामंजस्य करारावर विद्यापीठाचे प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे आणि



डॉ. प्रसाद यांनी स्वाक्षरी केल्या. यावेळी जैवतंत्रज्ञान अधिविभागाच्या प्रमुख डॉ. ज्योती जाधव यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. यावेळी प्रा. व्ही. ए. बापट, डॉ. प्रशांत कवर, डॉ. सुषमा पाटील, महेश कांबळे आदी उपस्थित होते.

15 MAR 2022 लोकसत्ता

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# वैद्यकीय शिक्षणासाठी विशेष धोरणाची गरज - शिर्के

लोकसत्ता प्रतिनिधी



कुलगुरू डॉ. डी.टी.शिर्के यांनी डॉ. जयसिंगराव पवार, प्रा. डॉ. एस. आर. यादव यांना सन्मानित केले. सोबत कुलपती डॉ. संजय डी. पाटील, आमदार ऋतुराज पाटील, कुलगुरू डॉ. राकेश कुमार मुदगल.

**कोल्हापूर :** रशिया आणि युक्रेन युद्धामुळे वैद्यकीय क्षेत्र पुन्हा चर्चेत आले आहे. या विद्यार्थ्यांचे भवितव्य पाहता सरकारला विशेष धोरण तयार करावे लागेल, असे मत शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी.टी.शिर्के यांनी शनिवारी व्यक्त केले.

डी. वाय. पाटील अभिमत विद्यापीठाचा दहावा दीक्षान्त समारंभ शनिवारी येथे पार पडला. प्रमुख पाहुणे म्हणून कुलगुरू शिर्के म्हणाले,की रशिया व युक्रेनमधील संघर्षामुळे वैद्यकीय शिक्षण घेणारे विद्यार्थी भारतात परतत आहेत. या घटनेनंतर त्यांच्या उर्वरित शिक्षणाचे पुढे काय, वैद्यकीय शिक्षणासाठी त्यांना इतक्या लांब का जावे लागते, हे दोन प्रश्न निर्माण झाले असून त्यासाठी विशेष धोरण तयार करावे लागेल. त्यापेक्षाही वैद्यकीय क्षेत्रातील शैक्षणिक संधींचा विस्तार केला पाहिजे.

ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. जयसिंगराव पवार यांना डी.लिट. तर ख्यातनाम वनस्पतिशास्त्रज्ञ प्रा. डॉ. एस. आर. यादव यांना डी.एस्सी. उपाधीने सन्मानित करण्यात आले. त्यांनी मनोगत व्यक्त केले. ३६१ विद्यार्थ्यांना पदवी व पदव्युत्तर पदवीने सन्मानित करण्यात आले. ९ विद्यार्थ्यांना सुवर्ण पदकाने गौरवण्यात आले तर डॉ. धनाजी मालवेकर यांना विशेष संशोधक म्हणून सन्मानित केले.

अध्यक्षस्थानी कुलपती डॉ. संजय डी. पाटील होते. त्यांनी आगामी प्रकल्पांची माहिती दिली. व्यवस्थापन समिती सदस्य आमदार ऋतुराज पाटील, पृथ्वीराज पाटील, तेजस पाटील, कुलगुरू डॉ. राकेश कुमार मुदगल, प्र- कुलगुरू डॉ. शिल्पा शर्मा, कुलसचिव डॉ. विश्वनाथ भोसले उपस्थित होते.

1 5 MAR 2022

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# केंद्राकडून विद्यापीठाला चार कोटींचा निधी

## शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के यांची पत्रकार परिषदेत माहिती



डॉ. पी. एस. पाटील



डॉ. के. डी. सोनावणे



डॉ. के. डी. पवार



डॉ. एम. इस. निंबाळकर

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठात नॅनोजैवतंत्रज्ञान व कॅन्सर वरील संशोधनास लागणाऱ्या सुविधांसाठी, भारत सरकारच्या जैवतंत्रज्ञान विभागाच्या बिल्डर (डीएसटी-बिल्डर) योजनेअंतर्गत ४.२७ कोटी रूपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. या योजनेअंतर्गत विद्यापीठास २.८५ कोटी रूपयांचा निधी मंजूर अनुदानातून नुकताच प्राप्त झाला आहे, अशी माहिती कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के व प्र-कुलगुरू डॉ. पी.एस. पाटील यांनी पत्रकार परिषदेत दिली.

कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, विद्यापीठातील चार विविध विज्ञान अधिविभागातील संशोधकांनी एकत्र येऊन केंद्र सरकारच्या विज्ञान व तंत्रज्ञान विभागास नॅनो-जैवतंत्रज्ञान व कर्करोगावरील संशोधनविषयक प्रस्ताव सादर केला होता. तो मंजूर करण्यात आला आहे. त्याअंतर्गत प्राप्त निधीतून नॅनो जैवतंत्रज्ञान व कर्करोगावरील संशोधनासाठी लागणारी आधुनिक आणि सुसज्ज प्रयोगशाळा उभारली जाईल. प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील या प्रकल्पाचे समन्वयक आहेत. या प्रकल्पाअंतर्गत सूक्ष्मजीवशास्त्र विभागाचे डॉ. के. डी. सोनवणे, नॅनोसायन्स, तंत्रज्ञान विभागाचे डॉ. के. डी. पवार व वनस्पतीशास्त्र विभागाचे डॉ. एम. एस. निंबाळकर प्रमुख अन्वेषक (Principal Investigato) म्हणून काम पाहणार आहेत. सदर प्रकल्पांतर्गत विविध धातूंचे, विविध आकाराचे नॅनोपार्टीकल्स तयार करणे व त्यांचे भौतिक गुणधर्म तपासणे याविषयी संशोधन केले जाईल. तसेच, जीवाणू, विषाणू, वनस्पती व कवच यांच्यातील नॅनोतंत्रज्ञानाला उपयुक्ततेबाबत संशोधनदेखील केले जाईल. पश्चिम घाटातील विविध वनस्पतींचा नॅनोपार्टीकल्स तयार करण्यासाठी आणि त्यांच्या औषधी व शेतीपूरक वापराबाबतही संशोधन करण्यात येईल. त्याचप्रमाणे बायोइन्फॉर्मेटिक्स तंत्रज्ञानाच्या साहाय्याने नॅनोकण व नॅनो मटेरिअल यांची प्रक्रिया करून नॅनोपार्टीकल्सचा सजीव पेशींवर होणाऱ्या परिणामांविषयी चाचण्या करून निष्कर्ष पडताळणी करण्यात येईल.

संशोधनामुळे विविध सजीवांचा उपयुक्त नॅनोकण निर्मिती करण्यासाठीच्या उपयोजनाबाबत भरीव माहिती मिळेल. नॅनोकण बनविणाऱ्या जीवाणूंचा शोध, नॅनोकण व नॅनोमटेरिअलचा कर्करोग, न्यूरोसायन्स, अल्झायमर (स्मृतिभ्रंश), टारगेटेड ड्रग डिलीव्हरी व रिलीज, कृषी क्षेत्रासाठी उपयुक्त नॅनोमटेरिअल, नॅनो पेस्टीसाईड आदी अनुषंगानेही संशोधन केंद्रित असेल. याबरोबरच नॅनो तंत्रज्ञानाला पूरक स्वरूपाचे अध्ययन, अध्यापन आणि त्यासंदर्भातील संशोधनासाठी लागणारे प्रशिक्षण, कार्यशाळा, वेबिनार, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय परिषदांचे आयोजन यांचाही या प्रकल्पात समावेश आहे.

15 MAR 2022

लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# नॅनो जैवतंत्रज्ञान संशोधनासाठी विद्यापीठाला चार कोटींचा निधी

## डी. टी. शिर्के : डीएसटी-बिल्डर योजनेअंतर्गत अनुदान

लोकमत न्यूज नेटवर्क,

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठात नॅनो जैवतंत्रज्ञान, कर्करोगावरील संशोधन सुविधांसाठी केंद्र सरकारच्या जैवतंत्रज्ञान विभागाच्या बिल्डर (डीएसटी-बिल्डर) योजनेअंतर्गत ४ कोटी २७ लाख रुपयांचा निधी मंजूर झाला आहे. त्यापैकी विद्यापीठाला २ कोटी ८५ लाख रुपयांचा निधी मिळाल्याची माहिती कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के आणि प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांनी सोमवारी पत्रकार परिषदेत दिली.

विद्यापीठाच्या चार विविध विज्ञान अधिविभागातील संशोधकांनी एकत्र येऊन केंद्र सरकारच्या विज्ञान व तंत्रज्ञान विभागास नॅनो जैवतंत्रज्ञान आणि कर्करोगावरील संशोधनविषयक सादर केलेला प्रस्ताव मंजूर झाला. यात संशोधनासाठी लागणारी आधुनिक, सुसज्ज प्रयोगशाळा उभारली जाणार आहे. प्र-कुलगुरू डॉ. पाटील हे या पंचवार्षिक प्रकल्पाचे समन्वयक म्हणून काम पाहत आहेत. या प्रकल्पाअंतर्गत सूक्ष्मजीवशास्त्र विभागाचे डॉ. के. डी. सोनवणे, नॅनो सायन्स आणि तंत्रज्ञान विभागाचे डॉ. के. डी. पवार, वनस्पतीशास्त्र विभागाचे डॉ. एम. एस. निंबाळकर प्रमुख अन्वेषक म्हणून काम पाहणार आहेत.

या प्रकल्प्रांतर्गत विविध धातूंचे नॅनो पार्टिकल्स तयार करणे. त्यांचे भौतिक गुणधर्म तपासणे. जिवाणू, विषाणू, वनस्पती, कवक यांच्यामधील नॅनो तंत्रज्ञानाला उपयुक्ततेबाबत संशोधन केले जाईल. पश्चिम घाटातील विविध वनस्पतींचा नॅनो पार्टिकल्स निर्मितीसाठी त्यांच्या औषधी, शेतीपूरक वापराबाबतही संशोधन करण्यात येईल. बायोइन्फॉर्मेटिक्स तंत्रज्ञानाच्या साहाय्याने नॅनोकण, नॅनो मटेरिअल यांची प्रक्रिया करून नॅनो पार्टिकल्सचा सजीव पेशींवर होणाऱ्या परिणामांविषयी चाचण्या करून निष्कर्ष पडताळणी होणार असल्याचे प्र-कुलगुरू डॉ. पाटील यांनी सांगितले.



पी एस पाटील



के. डी. सोनवणे



एम. एम. निंबाळकर



के. डी. पवार

### कृषी क्षेत्रासाठी उपयुक्त संशोधन

या संशोधनामुळे विविध सजीवांचा उपयुक्त नॅनोकण निर्मितीसाठीच्या उपयोजनांबाबत माहिती मिळेल. नॅनोकण बनविणाऱ्या जीवाणूंचा शोध, नॅनोकण व नॅनो मटेरिअलचा कर्करोग, न्यूरोसायन्स, अल्झायमर (स्मृतिभ्रंश), टार्गेटेड ड्रग डिलिव्हरी व रिलीज, कृषी क्षेत्रासाठी उपयुक्त नॅनो मटेरिअल, नॅनो पेस्टिसाईड आदी अनुषंगानेही संशोधन केंद्रित असेल. याबरोबरच नॅनो तंत्रज्ञानाला पूरक स्वरूपाचे अध्ययन, अध्यापन आणि त्यासंदर्भातील संशोधनासाठी लागणारे प्रशिक्षण, कार्यशाळा, वेबिनार, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय परिषदांचे आयोजन यांचा समावेश असल्याचे डॉ. सोनवणे यांनी सांगितले.

15 MAR 2022

पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठास ४.२७ कोटींचा निधी

## नॅनो-जैवतंत्रज्ञान, कर्करोगविषयक संशोधन प्रकल्पास मिळणार चालना




डॉ. पी. एस. पाटील डॉ. के. डी. सोनवणे




डॉ. एम. एस. निंबाळकर डॉ. के. डी. पवार

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठात नॅनो-जैवतंत्रज्ञान व कॅन्सरवरील संशोधनास लागणाऱ्या सुविधांसाठी भारत सरकारच्या जैवतंत्रज्ञान विभागाच्या बिल्डर (डीएसटी-बिल्डर) योजनेंतर्गत ४.२७ कोटी रुपयांचा निधी मंजूर झाला आहे. यातील २.८५ कोटी रुपयांचा निधी नुकताच प्राप्त झाला आहे. यामुळे नॅनो-जैवतंत्रज्ञान व कर्करोगविषयक संशोधन प्रकल्पाला चालना मिळणार असल्याची माहिती कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांनी पत्रकार परिषदेत दिली.

विद्यापीठातील चार संशोधकांनी एकत्र येऊन केंद्र सरकारच्या विज्ञान व तंत्रज्ञान विभागास गेल्यावर्षी सादर केलेला प्रकल्प मंजूर झाला आहे. यातून नॅनो-जैवतंत्रज्ञान व कर्करोगावरील संशोधनाची आधुनिक, सुसज्ज प्रयोगशाळा उभारली जाणार आहे. प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील पंचवार्षिक प्रकल्पाचे समन्वयक आहेत. प्रकल्पांतर्गत सूक्ष्मजीवशास्त्र विभागाचे डॉ. के. डी. सोनवणे, नॅनो सायन्स व तंत्रज्ञान विभागाचे डॉ. के. डी. पवार, वनस्पतिशास्त्र विभागाचे डॉ. एम. एस. निंबाळकर प्रमुख अन्वेषक आहेत.

**● संशोधनामुळे विविध सजीवांच्या उपयुक्त नॅनो कणनिर्मितीसाठीच्या उपयोजनांची माहिती मिळेल. नॅनो कण बनविणाऱ्या जीवाणूंचा शोध, नॅनो कण व नॅनो मटेरिअलचा कर्करोग, न्यूरोसायन्स, अल्झायमर, टार्गेटेड ड्रग डिलिव्हरी व रीलिज, कृषी क्षेत्रासाठी उपयुक्त नॅनो मटेरिअल, नॅनो पेस्टिसाईड या अनुषंगाने संशोधन केंद्रित असणार आहे.**

प्रकल्पांतर्गत विविध धातू, विविध आकाराचे नॅनो पार्टिकल्स तयार करणे व त्यांचे भौतिक गुणधर्म तपासणे याविषयी संशोधन केले जाईल. जीवाणू, विषाणू, वनस्पती व कवक यांच्यामधील पान ४ वर ▶

## शिवाजी विद्यापीठास ४.२७ कोटींचा निधी

**(पान १ वरून)** नॅनो तंत्रज्ञानाच्या उपयुक्ततेबाबत संशोधन होणार आहे. पश्चिम घाटातील विविध वनस्पतींचा नॅनो पार्टिकल्स तयार करण्यासाठी व त्यांच्या औषधी व शेतीपूरक वापराचे संशोधन होईल. बायोइन्फॉर्मेटिक्स तंत्रज्ञानाच्या साहाय्याने नॅनो कण व नॅनो मटेरिअल यांची प्रक्रिया करून नॅनो पार्टिकल्सच्या सजीव पेशींवर होणाऱ्या परिणामांविषयी चाचण्या करून निष्कर्ष पडताळणी होईल.

1 5 MAR 2022

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# रक्ताच्या कर्करोगावर आयुर्वेदिक औषध

## शिवाजी विद्यापीठाच्या वनस्पती शास्त्रज्ञांना ऑस्ट्रेलियन पेटंट मंजूर

सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. १४ : शिवाजी विद्यापीठाच्या वनस्पतीशास्त्र अधिविभागातील वनस्पती शास्त्रज्ञांच्या चमूला रक्ताच्या कर्करोगावरील उपचारासाठी आयुर्वेदिक औषध निर्मितीसाठी ऑस्ट्रेलियन सरकारकडून औषधनिर्मिती पेटंट मंजूर झाले.

वनस्पतीशास्त्र अधिविभागातील वरिष्ठ प्रा. डॉ. डी के गायकवाड, संशोधक विद्यार्थी डॉ. चिराग नारायणकर, डॉ. निवास देसाई, डॉ. मानसी पाटील (स.गा.म. कॉलेज कराड), डॉ. सागर देशमुख (न्यू कॉलेज), डॉ. प्रतिष्ठा पवार (दा. पा. कॉलेज, कर्जत), डॉ. उमेश पवार (पं. खे. कॉलेज, सावंतवाडी) यांना ऑस्ट्रेलिया सरकारकडून 'सिंथेसिस ऑफ ब्लड कॅन्सर सेल ग्रोथ इनहीबीटर' यावरील औषधनिर्मितीमध्ये पेटंट मंजूर झाले.



डॉ. डी. के. गायकवाड



डॉ. निवास देसाई



डॉ. चिराग नारायणकर

रक्ताचा कर्करोग घातक आजार असून, या भीषण रोगाला प्रतिरोध करणाऱ्या औषधनिर्मितीसाठी जगभरातील संशोधक प्रयत्न करत आहेत. या संशोधनाचा एक भाग म्हणून विद्यापीठातील वनस्पतीशास्त्र विभागाचे प्रा. गायकवाड, त्यांच्या संशोधक विद्यार्थ्यांनी औषधाची निर्मिती केली.

डॉ. गायकवाड म्हणाले, ''औषधात निवडुंग प्रजातीच्या वनस्पतीचा अर्क वापरला आहे. यातील जिवाणूरोधक गुणधर्मामुळे रक्ताच्या कर्करोगाच्या पेशींची मात्रा कमी करण्यासाठी ते प्रभावी ठरू शकते. या आयुर्वेदिक औषधाच्या मदतीने रक्ताच्या कर्करोगाच्या उपचारावर चांगला पर्याय देण्याचा प्रयत्न आहे.''

संपूर्ण टीमला स्तनाच्या कर्करोगावरील उपचारासाठी भारत सरकारकडून दोन पेटंट मंजूर झाले. या टीमने कर्करोगावरील संशोधनासाठी अमेरिकेकडेही पेटंटसाठी प्रस्ताव पाठवला. या चमूला कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, माजी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांचे मार्गदर्शन लाभले.

1 5 MAR 2022

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# वातावरण बदलाचा होणार अभ्यास

## कुलगुरू डॉ. शिर्के; पन्हाळ्यावरील केंद्रात बसवणार उपकरणे

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. १४ : ''वैश्विक आणि सौर किरणांमुळे वातावरणातील वरच्या थरामध्ये होणाऱ्या घडामोडी आणि बदलांचा सविस्तर अभ्यास आता शिवाजी विद्यापीठात करता येईल,'' अशी माहिती कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी आज येथे दिली.

डॉ. शिर्के म्हणाले, ''अंतरिक्ष विभागांतर्गत येणाऱ्या अहमदाबाद येथील भौतिक अनुसंधान प्रयोगशाळा व विद्यापीठ यांच्यात २०२१ ला वातावरणातील मध्यांबर (मेसोस्फियर), दलांबर (आयनोस्फियर), ऊष्मांबर (थर्मोस्फियर) या जमिनीपासून ५० ते ५०० किलोमीटर इतक्या अंतरामध्ये उत्सर्जित होणाऱ्या एकाधिक तरंगलांबीच्या प्रकाश किरणांचा अभ्यास करण्यासाठी सामंजस्य करार झाला होता. त्याअंतर्गत भौतिक अनुसंधान प्रयोगशाळेकडून



सुमारे एक कोटी रुपयांची उपकरणे विद्यापीठाच्या पन्हाळा येथील अवकाश संशोधन केंद्रात बसवण्यात येणार आहेत.''

ते म्हणाले, ''उपकरणे बसविण्यासाठी लागणाऱ्या वेधशाळेच्या निर्मितीसाठी विद्यापीठाकडून सुमारे २२ लाख रुपयांची तरतूद केली आहे. सीसीडी आधारित मल्टिवेव्हलेंथ एअरग्लो फोटोमीटर, पीआरएल एअरग्लो इन्फ्रारेड स्पेक्ट्रोग्राफ तंत्रज्ञानावर



संग्रहित छायाचित्र.

आधारित उपकरणांचा समावेश आहे. अशा सुविधांयुक्त वेधशाळा सध्या अहमदाबाद व हैदराबाद येथे कार्यान्वित आहेत. काही महिन्यांत विद्यापीठाच्या अवकाश संशोधन केंद्राचे नाव या यादीत समाविष्ट होणार आहे.''

तिन्ही केंद्रांद्वारे एकत्रितरीत्या संशोधन करून वैश्विक आणि सौर किरणांमुळे वातावरणातील वरच्या थरामध्ये होणाऱ्या घडामोडी आणि बदलांचा सविस्तर अभ्यास करता येणार आहे. यामुळे विद्यापीठात अवकाश संशोधनासाठी लागणाऱ्या मूलभूत संशोधन सुविधेत वाढ होणार आहे. संशोधक विद्यार्थ्यांना त्याचा उपयोग होणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

सकाळ

# डॉ. डी. वाय. पाटील यांना प्राचार्य कणबरकर पुरस्कार

## कुलगुरू डॉ. शिर्के; १३ एप्रिलला होणार वितरण

कोल्हापूर, ता. १४ : शिवाजी विद्यापीठातर्फे देण्यात येणारा प्राचार्य रा. कृ. कणबरकर राष्ट्रीय पुरस्कार यंदा पद्मश्री डॉ. डी. वाय. पाटील यांना जाहीर झाला. १ लाख ५१ हजार रुपये, स्मृतिचिन्ह, मानपत्र, शाल व श्रीफळ असे पुरस्काराचे स्वरूप आहे. वितरण १३ एप्रिलला राजर्षी शाहू सभागृहात दुपारी चार वाजता होईल, अशी माहिती कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी पत्रकार परिषदेत दिली.



डी. वाय. पाटील

डॉ. शिर्के म्हणाले, 'डॉ. पाटील यांनी सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक, क्रीडा व राजकीय क्षेत्रात महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. डी. वाय. पाटील एज्युकेशन सोसायटी व डी. वाय. पाटील प्रतिष्ठानचे ते संस्थापक अध्यक्ष आहेत. त्यांच्या माध्यमातून १७२ हून अधिक शैक्षणिक संस्था देशभरात सुरू आहेत. त्यांनी अनेक संस्थांचे अध्यक्ष, उपाध्यक्ष, संचालक, सल्लागार मंडळाचे सदस्य, विश्वस्तपद भूषवले आहे.'

शोध समितीतील सदस्य डॉ. जे. एफ. पाटील म्हणाले, 'डॉ. पाटील यांना शैक्षणिक क्षेत्रातील कार्याची दखल घेऊन भारत सरकारकडून पद्मश्री पुरस्कार मिळाला आहे. शिवाजी विद्यापीठानेही डी. लिट. पदवी देऊन त्यांना सन्मानित केले आहे. राजीव गांधी सद्भावना, महाराष्ट्र भूषण, महाराष्ट्र समाज भूषण, जायंट आंतरराष्ट्रीय, शिक्षण तज्ज्ञ, मराठा विश्वभूषण, जीवनगौरव असे अनेक पुरस्कार मिळाले आहेत.'

पत्रकार परिषदेस प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, उपकुलसचिव वैभव ढेरे, डॉ. भालबा विभुते, अरुण कणबरकर, प्राचार्य बी. ए. खोत उपस्थित होते.

सकाळ

# डॉ. गोमटेश्वर पाटील संपादित ग्रंथांचे गुरुवारी प्रकाशन

कोल्हापूर : संत तुकाराम बीज व डॉ. गोमटेश्वर पाटील संपादित मध्ययुगीन मराठी जैन साहित्यातील हस्तलिखित सतरा संपादित ग्रंथांचे प्रकाशन गुरुवारी (ता. १७) होत आहे. दसरा चौकातील राजर्षी छत्रपती शाहू स्मारक भवनमध्ये सायंकाळी पाच वाजता कार्यक्रमास सुरुवात होईल. शिवाजी विद्यापीठातील संत तुकाराम अध्यासन व राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळातर्फे कार्यक्रमाचे आयोजन केले आहे. ज्येष्ठ विचारवंत डॉ. सदानंद मोरे यांच्या हस्ते ग्रंथाचे प्रकाशन होणार असून, कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के अध्यक्षस्थानी असतील.

सकाळ

# शाहू कॉलेजमध्ये आंतरराष्ट्रीय परिषद

**कदमवाडी :** राजर्षी छत्रपती शाहू कॉलेजमध्ये ॲडव्हान्स् इन सायन्स अँड टेक्नॉलॉजी यावर सायन्स विभागातर्फे दोनदिवसीय ऑनलाईन आंतरराष्ट्रीय परिषद झाली. विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, काझीरंगा विद्यापीठ आसामचे माजी कुलगुरू डॉ. विलास साळोखे यांच्या उपस्थितीत उद्‌घाटन झाले. रिसोर्स पर्सन म्हणून डॉ. दीपक शिंदे (लंडन), डॉ. राहुल जमदाडे (शारजाह), डॉ. फॅम होंग (व्हिएतनाम), डॉ. यु. वुन (मलेशिया), डॉ. महेश सूर्यवंशी (ऑस्ट्रेलिया), डॉ. सकटे (तमिळनाडू) यांनी मार्गदर्शन केले. डॉ. प्रकाश वडगावकर उपस्थित होते. डॉ. एम. बी. शेख अध्यक्षपदी होते. प्रभारी प्राचार्य डॉ. आर. एस. डुबल उपस्थित होते. डॉ. एस. व्ही. पाटील परिषदेचे समन्वयक, डॉ. के. व्ही. गायकवाड यांनी आयोजक म्हणून काम पाहिले. प्राची बोटे यांनी सूत्रसंचालन केले. उपप्राचार्य डॉ. व्ही. व्ही. किल्लेदार यांनी आभार मानले.

1 5 MAR 2022 सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# समस्या ओळखून प्रभावी कल्पनापूर्ण उत्तरे शोधावीत : प्रतिमा किर्लोस्कर

## शिवाजी विद्यापीठात 'स्टार्टअप सूत्र'अंतर्गत व्याख्यान



कोल्हापूर, ता. १४ : 'यशस्वी उद्योजक होण्यसाठी इनोव्हेटिव्ह असावे. जाणीवपूर्वक निरीक्षणाने सभोवताली असणाऱ्या समस्या ओळखून प्रभावी कल्पनापूर्ण उत्तरे शोधावीत,' असे मत किर्लोस्कर ब्रदर्स पुणे इनोव्हेशनच्या (सोसायटी) अध्यक्षा प्रतिमा किर्लोस्कर यांनी व्यक्त केले.

विद्यापीठात आयोजित 'स्टार्टअप सूत्र' ऑनलाईन व्याख्यानमालेत त्यांचे 'इनोव्हेशन व उद्योजकता याकरिता महिलांचे सबलीकरण' यावर बीजभाषण झाले. कुलगुरू प्रा. डॉ. डी. टी. शिर्के अध्यक्षस्थानी होते.

किर्लोस्कर म्हणाल्या, 'ऑनलाइन प्लॅटफॉर्मच्या माध्यमातून इनोव्हेशनची माहिती मिळवता येऊ शकते. शिक्षणक्षेत्राबरोबर वित्त, आरोग्य, दळणवळण क्षेत्रांत स्टार्टअप्स सुरू करता येऊ शकतात. इनोव्हेशनला सीमा नाही. स्टार्टअप्सकरिता ग्लोबल-स्केलेबल-डिलिव्हरेबल असते. यशस्वी होण्याकरिता जोखीम पत्करणे, योग्य वेळी कृती करणे महत्त्वाचे आहे.'

डॉ. शिर्के म्हणाले, 'समस्या शोध ही इनोव्हेशनकरिता महत्त्वाची आहे. याकरिता विविध घटकांशी संवाद साधणे गरजेचे आहे.' प्र-कुलगुरू प्रा. डॉ. पी. एस. पाटील उपस्थित होते. याचनीत पुष्करणा यांनी इनोव्हेशन २.० यावर सादरीकरण केले. नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य केंद्राचे प्रभारी संचालक प्रा. डॉ. एम. एस. देशमुख यांनी स्वागत केले. एसयुके रिसर्च अँड डेव्हलपमेन्ट सेंटरचे सीईओ प्रा. डॉ. पी. डी. राऊत यांनी परिचय करून दिला. हर्षवर्धन पंडित यांनी सूत्रसंचालन केले.

### इनोव्हेशन चॅलेंजचे आयोजन

किर्लोस्कर समूह, शिवाजी विद्यापीठातर्फे लवकरच एका इनोव्हेशन चॅलेंजचे आयोजन केले जाईल. याकरिता एक विशिष्ट प्रश्न देऊन त्यावर उत्तरे शोधण्याकरिता विद्यार्थी प्राध्यापक, संशोधकांना निमंत्रित करून त्यांना सादरीकरणाची संधी दिली जाईल. प्रभावी समस्या समाधानास योग्य बक्षीस देऊन गौरविले जाईल, असे किर्लोस्कर यांनी जाहीर केले. याबाबतची माहिती विद्यापीठाच्या संकेतस्थळावर जाहीर केली जाईल.

सकाळ

# शाहू महाविद्यालयात आज चर्चासत्र

**कदमवाडी :** राजर्षी छत्रपती शाहू महाविद्यालयात 'रिसर्च ॲडव्हान्स इन सोशल सायन्स, कॉमर्स ॲण्ड मॅनेजमेंट' यावर एकदिवसीय ऑनलाईन आंतरराष्ट्रीय चर्चासत्राचे आयोजन १५ मार्चला केले आहे. रयत शिक्षण संस्थेच्या मॅनेजिंग कौन्सिलचे सदस्य डॉ. एम. बी. शेख, शिवाजी विद्यापीठाचे उपकुलगुरू प्रा. डॉ. पी. एस. पाटील उद्घाटन सत्राच्या अध्यक्षस्थानी असतील. या ऑनलाईन आंतरराष्ट्रीय चर्चासत्रात प्रा. डॉ. प्रवीण सप्तर्षी (पुणे), डॉ. पी. एम. लिटन (बांगलादेश) मार्गदर्शन करणार आहेत. रयतच्या सहसचिव प्राचार्य डॉ. प्रतिभा गायकवाड समारोप सत्राच्या अध्यक्षस्थानी असतील. प्रा. डॉ. भारती पाटील उपस्थित राहतील.

तरुण भारत

# 'लेखक जे पेरतील तेच उगवणार'

**कोल्हापूर :** माझ्या मनात लिहीणं हे सतत रुंजी घालत असते. त्या अर्थानं मी सातत्यानं 'मनात" लिहीणारा माणूस ठरतो. वाचक म्हणून आपण जे पेरू, तेच कालांतरानं उगवून येतं, अशी माझी लेखनामागची धारणा आहे, असे मत साहित्यिक तथा शिवाजी विद्यापीठाचे अधीक्षक डॉ. किरण गुरव यांनी व्यक्त केले.




**नवी दिल्ली: साहित्य अकादमी पुरस्कार अकादमीचे चेअरमन डॉ. चंद्रशेखर कंबार यांच्या हस्ते स्विकारताना डॉ. किरण गुरव.**

नवी दिल्ली येथील कमलानी सभागृहात झालेल्या साहित्य अकादमी पुरस्कार प्रदान सोहळयात ते बोलत होते. साहित्य अकादमीचे चेअरमन डॉ. चंद्रशेखर कंबार यांच्या हस्ते साहित्य अकादमी पुरस्कार डॉ. गुरव यांना प्रदान करण्यात आला. प्रमुख पाहुणे ज्येष्ठ साहितियक डॉ. भालचंद्र नेमाडे व साहित्य अकादमीचे व्हाईस चेअरमन माधव कौशिक उपस्थित होते. जयंत पवार आणि आसाराम लोमटे यांच्यानंतर मराठी कथेला तिसरा साहित्य अकादमी पुरस्कार आपल्या 'बाळूच्या अवस्थांतराची डायरी" या कथासंग्रहाला दिल्याबद्दल डॉ. गुरव यांनी कृतज्ञता व्यक्त केली. देशभरातील साहित्य अकादमी विजेत्या २४ विविध भाषिक साहित्यिकांचा 'लेखक-संवाद" हा उपक्रमही समाविष्ट आहे. यात डॉ. किरण गुरव मराठी साहित्याचे प्रतिनिधी म्हणून सहभागी होणार आहेत.

तरुण भारत

# डॉ. गोमटेश्वर पाटील संपादित ग्रंथांचे गुरुवारी प्रकाशन

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातील संत तुकाराम अध्यासन आणि मुंबई येथील महाराष्ट्र राज्य आणि संस्कृती मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने गुरूवार १७ मार्च रोजी शाहू स्मारक भवन येथे सायंकाळी ५ वाजता संत तुकाराम बीज व ग्रंथप्रकाशन होणार आहे. महावीर कॉलेजमधील डॉ. गोमटेश्वर पाटील संपादित मध्ययुगीन मराठी जैन साहित्यातील हस्तलिखित १७ संपादित ग्रंथ (२४ खंड) प्रकाशन राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाचे अध्यक्ष डॉ. सदानंद मोरे यांच्या हस्ते होणार आहे, अशी माहिती कुलगुरू डॉ. डी. डी. शिर्के यांनी दिली.

तरुण भारत

# डॉ. डी. वाय. पाटील यांना प्राचार्य कणबरकर पुरस्कार

## १३ एप्रिलला शिवाजी विद्यापीठात वितरण

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठातर्फे देण्यात येणारा राष्ट्रीय प्राचार्य आर. के. कणबरकर पुरस्कार पद्मश्री डॉ. डी. वाय. पाटील यांना जाहीर करण्यात आला आहे. १३ एप्रिल रोजी दुपारी ४ वाजता हा पुरस्कार शिवाजी विद्यापीठ येथे प्रदान करण्यात येणार आहे. १ लाख ५१ हजार रुपये रोख, स्मृतिचिन्ह, शाल, श्रीफळ असे या पुरस्काराचे स्वरूप आहे, अशी माहिती कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी पत्रकार परिषदेत दिली.



डॉ. डी. वाय. पाटील यांचा जन्म २२ ऑक्टोबर १९३५ मध्ये कोल्हापूर जिल्ह्यातील अंबप येथे झाला. त्यांनी एम. ए., एल. एल. बी., पीएच. डी., पदवी प्रथम श्रेणीत उत्तीर्ण केली आहे. शिवाजी विद्यापीठाने त्यांना २०१५ मध्ये डी. लिट. पदवी देऊन सन्मानित केले आहे.

पान ९ पहा

# डॉ. डी. वाय. पाटील यांना प्राचार्य कणबरकर पुरस्कार

पान १ वरून

डॉ. पाटील यांनी सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक, राजकीय क्षेत्रातील कार्यातून शिक्षण आणि आरोग्य सेवेसाठी महत्वपूर्ण योगदान दिले आहे. त्यांनी के. जी. टू पी. जी. पर्यंत शिक्षण सर्वसामान्यांना मिळावे म्हणून १७२ पेक्षा जास्त शैक्षणिक संस्थांची स्थापना केली.

पुणे, मुंबई आणि कोल्हापुरातील अभियांत्रिकी, वैद्यकीय, कृषी शिक्षण संस्थांमधून अनेक सर्वसामान्यांच्या मुलांना उच्च शिक्षण मिळाले. त्याचबरोबर श्रीराम सहकारी संस्था, महापालिका, जिल्हा मार्केट, राज्य विद्युत मंडळ, देवस्थान समिती, नाट्य परिषद आदी राजकीय, सहकार क्षेत्रातील संस्थांचे नेतृत्व केले आहे. २७ नोव्हेंबर २००९ ते २०१३ त्रिपुराचे राज्यपाल, २२ मार्च २०१३ ते २६ नोव्हेंबर २०१५ बिहारचे राज्यपाल, ३ जुलै ते २०१४ ते १७ जुलै २०१४ पश्चिम बंगालचे राज्यपाल होते. सर्वच क्षेत्रात अतुलनीय काम करणाऱ्या व्यक्तीला प्राचार्य रा. कृ. कणबरकर पुरस्काराने शिवाजी विद्यापीठ सन्मानित करीत आहे, हा विद्यापीठाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला जाणार आहे.

शिवाजी विद्यापीठाचे माजी कुलगुरू प्राचार्य रा. कृ. कणबरकर यांच्या स्मृतीप्रित्यर्थ राष्ट्रीय पातळीवरील पुरस्कार निर्मितीसाठी त्यांच्या कुटुंबीयांनी शिवाजी विद्यापीठास २५ लाख रूपयांच्या ठेवीसाठी धनादेश प्रदान केला. हा पुरस्कार देशातील शैक्षणिक, साहित्यिक, सामाजिक, सांस्कृतिक, क्रीडा तसेच अन्य क्षेत्रात उत्कृष्ट कामगिरी बजावणाऱ्या व्यक्तीला किंवा संस्थेला दिला जातो. १९८० ते ८३ या कालावधीत शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू म्हणून कणबरकर कार्यरत होते. त्यांच्या कालावधीत अनेक विभागांची नव्याने निर्मिती झाली आहे. त्यांच्या कार्याची दखल घेऊन शाहू पुरस्कार, आदर्श शिक्षक पुरस्कार, कर्मवीर भाऊराव पाटील पुरस्कार, कोल्हापूर भूषण पुरस्कार अशा अनेक पुरस्कारांनी त्यांना सन्मानित केले आहे.

यावेळी यावेळी प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, शोध समितीचे सदस्य डॉ. जे. एफ. पाटील, प्राचार्य डॉ. बी. ए. खोत, डॉ. भालबा विभूते, डॉ. अरुण कणबरकर, उपकुलसचिव डॉ. वैभव ढेरे, जनसंपर्क अधिकारी अलोक जत्राटकर आदी उपस्थित होते.